**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३२८८/०२**

**श्री. मनोजकुमार जयवंत सामंत**
**४/४० तळ मजला, गणेश बिल्डींग,**
**पांडुरंगवाडी रोड नं.३,**
**गोरेगांव (पू), मुंबई ४०० ०६३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था (३), मुंबई**
**गृहनिर्माण भवन, तळ मजला कक्ष क्र.६९,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक**
**सहकारी संस्था, ३१६/अे, इमारत,**
**तिसरा मजला, ट्रक टर्मिनल,**
**आर.टि.ओ. ऑफिसजवळ, वडाळा (पू)**
**मुंबई ४०० ०३७.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मनोजकुमार सामंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०३.२००९ रोजी अर्ज करुन, निलेश सहकारी गृहनिर्माण संस्था पांडुरंगवाडी, गोरेगांव पूर्व, मुंबई ने सन १९८५ ते २००८ या कालावधीत केलेल्या आडीटेड आकाउंन्ट स्टेटमेंट (Balance Sheet, Income - Expenditure Statement) ची छायाप्रत व अनुषंगीक माहिती मागीतली होती. कार्यालयात लेखापरिक्षण अहवाल १ वर्षा पर्यंत जतन करुन ठेवले जातात. त्यामुळे यापूर्वीचे लेखापरिक्षण अहवाल कार्यालयात उपलब्ध नाहीत. सन २००७-२००८ या वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल कार्यालयात मिळाल्याचे आढळून येत नाही. संस्थेकडून प्राप्त करुन उपलब्ध करुन देण्यात येईल असे दि.१९.०३.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविण्यात आले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०२.०५.२००९ रोजी अपील दाखल केले. सुनावणी आयोजित करण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, लेखापरिक्षण अहवालाबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी संस्थेकडून गेल्या ३ वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल, Balance Sheet प्राप्त करुन घ्यावे व अपीलकारास ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०५.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/३७४/०२**

**श्री.अर्नेस्ट सुटले**
**चेंबूर इलेव्हन हेलन को.ऑ.हौ.सो.लि,**
**इमारत क्र.११, सहकार नगर-३,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता**
**(इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एम/पश्चिम विभाग, शरदभाउ आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.अर्नेस्ट सुटले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२२.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार अनुपस्थित होते. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने, गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, चेंबूर इलेव्हन हेवन गृहनिर्माण संस्थेत इमारत क्र.११ सहकार नगर-३ चेंबूर या इमारतीच्या निवासी सदनिका क्र.३३० मध्ये बांधण्यात आलेल्या साईबाबा मंदिरासाठी दिलेल्या परवानगीची प्रत मागीतली होती. गैरतक्रारदाराकडून माहिती मिळाली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे क्र.१०८७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर अपीलावर सुनावणी आयोजित केली. सदनिकेमध्ये साईबाबा मंदिर बांधण्यात दिलेल्या परवानगी पत्राची प्रत तक्रारदारास १५ दिवसाचे आत देणेबाबत दि.१०.११.२००८ रोजी आदेश पारित केले. विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने आयोगाच्या दि.१०.११.२००८ च्या आदेशाचे पालन केले किंवा कसे याबाबत संबंधीताकडून खुलासा मागविण्यात आला. सदनिका क्र.३३० मध्ये कार्यकारी अभियंता (इमारती प्रस्ताव) पूर्व उपनगरे या कार्यालयामार्फत साईबाबाच्या मंदिरासाठी कोणतीही परवानगी देण्यात आली नसल्याचे गैरतक्रारदारांनी, तक्रारदारास दि.०२.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. सदर

दि.०२.०४.२००९ च्या पत्राची प्रत गैरतक्रारदाराने आयोगात प्रत्यक्ष भेटून सादर केली. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने, तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार दफ्तरी दाखल करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०५.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२१६६/०२**

**श्री. व्होरा महेश जयंतीलाल**
**३०१, सुरुची, मित्तल कॉलेज जवळ,**
**भंडारवाडा, मालाड (प),**
**मुंबई ४०० ०९४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर वार्ड कार्यालय इमारत,**
**लिबर्टी गार्डन, मामलेदार वाडी,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व कलेक्टर**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर वार्ड कार्यालय इमारत,**
**लिबर्टी गार्डन, मामलेदार वाडी,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. महेश जयंतीलाल व्होरा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०९.२००८ रोजी अर्ज करुन, मालमत्ता क्र.०००९४१३२ लेखा क्र.पीएन ११०६१३५१९००१३२ विभाग, पी/उत्तर बाबत कोणत्या तारखेपासून मालमत्ता कर आकारणी करण्यात आला. दि.०१.०४.१९९३ ते दि.३०.०९.२००९ या कालावधीत महानगरपालिकाने आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराची रक्कम इत्यादी १२ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. माहिती पोटी शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१६.१०.२०००८ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकाराने सदर पत्राची प्रत स्वत: दि.२३.१०.२००८ रोजी कार्यालयातून प्राप्त करुन घेतली. परंतू अपीलकाराने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली

नाही. उलट माहितीच्या अधिकारात प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास विहित शुल्क आकारुन १५ दिवसात माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. अपीलकाराने शुल्क न भरुन देखील, कार्यालयात दि.१६.१२.२००८ रोजी प्रत्यक्ष भेटून माहिती प्राप्त करुन घेतली. त्यानंतर माहिती विलंबाने मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मालमत्ता क्र.०००९४१३२ बाबत एकूण १२ मुद्यांवर माहिती मागीतली होती. माहिती पोटी शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि.१६.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. अपीलकाराने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन न घेता प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. अपीलकारास मुद्येनिहाय माहिती शुल्क आकारुन १५ दिवसाचे आत द्यावी असे दि.२४.११.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही अपीलकाराने माहितीपोटी शुल्क भरले नाही. अपीलकाराने शुल्क न भरुन देखील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.१६.१२.२००८ रोजी माहिती दिली. माहिती विलंबाने दिली असल्याचा व्दितीय अपीलातील अपीलकाराचा मुध्दा लक्षात घेता जन माहिती अधिका-याकडून दि.१०.०९.२००९ च्या पत्रान्वये खुलासा मागविण्यात आला आहे. माहिती पोटी शुल्क भरण्याबाबत विहित कालावधीत म्हणजे दि.१६.१०.२००८ रोजी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते. शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन न घेता अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केल्यानंतरही

अपीलकाराने माहिती पोटी शुल्क भरले नाही.  तरी जन माहिती अधिका-यांना अपीलकारास मोफत माहिती दिली असल्याचा जन माहिती अधिका-यांना अपीलकारास मोफत माहिती दिली असल्याचा जन माहिती अधिका-यांनी दि.०५.१०.२००९ रोजी लेखी खुलासा सादर केला आहे.  सदर खुलाशाचे व अपीलातील कागदपत्राचे अवलोकन केले.  यावरुन असे दिसून येते की, अपीलकारास माहिती पुरविण्याकरिता जन माहिती अधिका-यांनी कसूर अथवा विलंब केलेला नाही.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/१३५४ अ/०२**

**श्री. सुमिर मनोहरलाल डेंमला**
**अे-२०२, गोदावरी शांतीवन,**
**बोरीवली (पू), मुंबई ४०० ०६६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी**
**सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय,**
**परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक (एम.इ आणि आर) अधिष्ठाता**
**सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय,**
**परेल, मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुमिर डेंमला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०३.२००८ रोजी अर्ज करुन, सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालयातील Ophthalmology या विषयीच्या सन २००६-२००७ या वर्षीच्या तृतीय वर्षाच्या पहिल्या व दुस-या सेमीस्टरच्या परीक्षेच्या नमुना उत्तरपात्रिका, गुणदेण्याची पध्दती, Answer key ची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२८.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर, मागणीप्रमाणे माहिती कार्यालयात उपलब्ध असून रू.९६/- शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणेबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.०५.२००८ च्या पत्रान्वये कळविले. दि.०२.०६.२००८ रोजी कार्यालयात उपस्थित झाले असता माहिती तयार नव्हती. संबंधीत कर्मचारी हजर नसल्याने माहिती घेण्याकरिता अपीलकारास दि.०६.०६.२००८ रोजी बोलावले. अपीलकारास माहिती देण्यात आली. परंतू मागीतलेली माहिती उशिराने दिली. माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता फे-या माराव्या लागल्या त्यामुळे येण्या जाण्याचा प्रवास खर्चाचा विनाकारण भुर्दंड सोसावा लागला. झालेल्या त्रासाबध्दल / प्रवास खर्चाबध्दल भरपाई द्यावी. विलंबाने माहिती

दिल्याबध्दल जन माहिती अधिका-यांना शास्ती लादावी म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित नव्हते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिका-यांनी विलंबाने, विनामुल्य पुरविली आहे. याबाबत जन माहिती अधिका-याकडून खुलासा मागविण्यात आला. तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ.ना.द.भोसले, उप अधिष्ठाता हे होते. सदर प्रकरणी यापूर्वी दि.०२.१२.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. त्यावेळी श्री.भोसले यांनी सुनावणीस उपस्थित राहून निवेदन दिले आहे की, "कार्यालयीन कामकाज जास्त असल्यामुळे सदर माहिती वेगवेगळ्या विभागातून संकलीत करुन ती एकत्रित करावयास जास्त वेळ लागला" तत्कालीन जन माहिती अधिका-याचा सदर खुलासा मान्य करण्यात यावा असा विद्यमान माहिती अधिका-यांनी दि.०९.०२.२००९ रोजी लेखी अहवाल सादर करुन विनंती केली आहे. जन माहिती अधिका-यांनी केलेला खुलासा लक्षात घेता त्यांना वेगवेगळ्या विभागाकडून माहिती संकलीत करण्याकरिता वेळ लागला. जाणूनबुजून विलंब केलेला दिसत नाही. या परिस्थितीत जन माहिती अधिका-यास शास्ती लादण्याबाबतची अपीलकाराची मागणी मान्य करता येत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १६.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३५६/०२**

**श्रीमती. मीटा नवाथे**
**७, गोविंद निवास, आनंद नगर,**
**जंगल मंगल रोड, भाडूंप (प),**
**मुंबई ४०० ०७८.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**म्हाडा, मुंबई बोर्ड, गृह निर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा मुख्य अधिकारी,**
**म्हाडा, मुंबई बोर्ड, गृह निर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती. मीटा नवाथे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०२.२००९ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने जानेवारी, २००६ व २००८ मध्ये म्हाडाच्या सदनिका वाटपाकरिता इच्छुक नागरीकाकडून अर्ज मागविले होते. त्यामध्ये अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती या वर्गवारीकरिता क्र.१८५, १९२ ते १९८ सदनिका आरक्षीत होत्या. मालवणी २००८ येथेही सदनिका आरक्षित होत्या. सदर सदनिका ज्या S.T, D.T.N.T. वर्गवारीच्या नागरीकाकरिता आरक्षीत होत्या त्या यशस्वी अर्जदारास वाटप करण्यात आल्या. त्यापत्राच्या तारखा, संबंधीत अर्जदारांनी सादर केलेल्या जाती/जमातीच्या वैद्यता प्रामणपत्राबाबत सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.३०.०७.२००९ च्या पत्रानुसार अपूर्ण माहिती पुरविली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जाती जमातीच्या वैद्यताप्रमाणपत्राबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. म्हाडाच्या सदनिका वाटपाकरिता जाहिरात प्रसिध्द करुन इच्छुक नागरीकाकडून म्हाडाने अर्ज मागविले होते. अनुसूचित जमाती, वि.जा.भ.ज.करिता सदनिका आरक्षीत होत्या. याकरिता वैद्यताप्रमाणपत्र सादर करण्याबाबत जाहिरातीत उल्लेख नव्हता. परंतू प्रत्यक्ष सदनिकाचे वाटपापूर्वी जमातीच्या वैद्यतेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले. यशस्वी अर्जदारास सदनिका वाटप केल्या, त्या एस.टी.एन.टी.डी.टी. च्या अर्जदाराच्या वैद्यताप्रमाणपत्राबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली आहे. सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २३.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४००/०२**

**श्री.वैभव सदानंद पालकर**
**५४/१३४५, कन्नमवार नंरग-२,**
**विक्रोळी-पूर्व, मुंबई ४०० ०८३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**दुसरा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा भूव्यवस्थापक (कुर्ला)**
**मुंबई मंडळ म्हाडा, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.वैभव सदानंद पालकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०१.२००९ रोजी अर्ज करुन, कन्नमवार नगर येथील इमारत क्र.७ व ८ समोरील शुश्रुषा हॉस्पीटल मागील नकाशात दर्शविलेल्या म्हाडाच्या मोकळा भुखंड एकाद्या संस्थेस अथवा व्यक्तीस भाडेतत्वावर / कायमस्वरुपी देण्यात आला असल्यास त्या व्यक्ती संस्थेचे नाव, पत्ता, भुखंड वाटप दिनांक, भुखंड ज्या वापरासाठी देण्यात आला त्याचा तपशिल. सदर भुखंड विक्री/भाडे तत्वावर देणेबाबत जाहिरात देण्यात आली होती का? त्याबाबतचा तपशिल. सदर मोकळ्या भुखंडाची आजतागायत ज्या व्यक्ती/संस्थांनी मागणी केली त्या व्यक्ती/ संस्थांची नावे, पत्ते सदर भुखंड विशिष्ट वापरासाठी आरक्षीत असले त्याचा तपशिल इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तसेच अपिलकार उपस्थित नव्हते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, म्हाडाच्या मोकळया भुखंडाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपीलकाराने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी भविष्यात, माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २३.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४२५/०२**

**श्री. लक्ष्मीचंद सत्रा**
**५०१, प्रतिक को.ऑ.हौ.सो.**
**मामलेतदारवाडी मेन रोड,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त/ कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर वार्ड कार्यालय, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता,**
**(इ व का), बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर वार्ड कार्यालय, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प), मुंबई ४०० ०६४.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.लक्ष्मीचंद सत्रा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.१२.२००८ रोजी अर्ज करुन, प्रतिक अपार्टमेंट मामलेतदारवाडी रोड, मालाड (प), मुंबई ४०० ०६४ येथे डॉ.संगवी यांनी केलेले अवैद्य बांधकाम, ओपन गॅरेजला लावलेले रेलींग शटर अवैद्य शेड याबाबत अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीनुसार केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२७.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास उचित माहिती १० दिवसाचे आत द्यावी असे दि.०३.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रतिक अपार्टमेंट मधील अवैद्यबांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधती माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास आवश्यकती माहिती तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २३.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४१०/०२**

**श्री. संदिप कारंडे**
**३०१ बी, रिझवी हाउस,**
**बांद्रा पोलीस स्टेशन शेजारी,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन रोड, वांद्रे (प),**
**मुंबई ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग,**
**सेंट मार्टिन रोड, वांद्रे (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.संदिप कारंडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खार पश्चिम येथील १५ वा रस्ता कॉर्नर या ठीकाणी व्हॅटीगो बार ॲण्ड रेस्टारंन्ट नावाने जुनेबार व नवीन मॅगी फेरा नावाने बार ॲण्ड रेस्टारंन्टच्या मालकाने अनधिकृतपणे बाहेरिल जागा व्यापून सदर जागेचा वापर व्यवसायासाठी करुन असल्याबाबत दि.१५.०४.२००९ रोजी तक्रारी केल्या आहेत. सदर तक्रारीनुसार काय कारवाई केली. सदर अनधिकृत बांधकामास परवानगी दिली असल्यास छायांकित प्रत, नसल्यास काय कार्यवाही केली याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१८.०७.२००९ रोजी अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, बार ॲण्ड रोस्टारंन्टच्या मालकाने अनधिकृतपणे केलेल्या बांधकामाबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीबाबत केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कारवाई वेळेत करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २३.१०.२००९**

(रामानंद तिवारी)
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३५१/०२**

**श्री. दत्ताराम कृष्णा पेडामकर व इतर**
**मरीअम्मा नगर, रूम नं.३३, एम-२२३,**
**नेहरू सेन्टर मागे, डॉ.ए.बी.रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-३, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावला कंपाउंड, डॉ.बी.ए.रोड, भायखळा (पू),**
**मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दत्ताराम पेडामकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०६.२००९ रोजी अर्ज करुन, श्री एक्कामुद्दीन बेग व श्री काळुराम जाधव यांचे विरोधात करण्यात आलेल्या चॅप्टर केस संदर्भातील कागदपत्राच्या प्रती तसेच तक्रार अर्जाची प्रत मागीतली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ (१) अनुसार त्रयस्थ पक्षाने अपीलकारास माहिती देण्यास मनाई केली असल्याच्या कारणावरून अपीलकारास माहिती नाकारण्यात आली. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२९.०६.२००९ रोजी अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०६.२००९ रोजी दिलेल्या उत्तराचे समर्थन करून दि.०७.०७.२००९ रोजी आदेश पारित करून प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउप अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.एक्कामुद्दीन बेग / श्री काळुराम जाधव यांच्या विरुध्द ताडदेव पोलीस ठाण्यातून चॅप्टर केस दाखल करण्यात आले त्याची प्रत मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, श्री.एक्कामुद्दीन बेग व श्री काळुराम जाधव यांच्या विरुध्द किती केसेस नोंदविण्यात आल्या आहेत. उभयताविरुध्द केसेस नोंदवितांना कोणकोणत्या कलमाखाली केसेस नोंदविल्या आहेत. याबाबत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २६.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३७८/०२**

**श्री. प्रविण खुर्देकर**
**४१०, कराणी बिल्डींग (यशोमंदिर)**
**साने गुरूजी मार्ग, ताडदेव, तुळशीवाडी,**
**मुंबई ४०० ०३४.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन (ई शाखा)**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रविण खुर्देकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०४.२००९ व दि.०८.०६.२००९ रोजी अर्ज करुन, अपीलकाराने मागीतलेल्या पोटहीस्सा मोजणीकामी श्रीमती. विद्या घोडिंदे, लघुटंकलेखिका, महसूल व वन विभाग, मंत्रालय यांनी शासन स्तरावरुन बेकायदा दबाव आणून गैरवाजवी हस्तक्षेप करुन अधिकाराचा दूरूपयोग केला. या गैरकृतीबध्दल त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी. त्यांच्या हस्तक्षेपामुळे अपीलकाराच्या मीळकत मोजणी कामाला विलंब झाला. यासाठी श्रीमती घोडिंदे जबाबदार असल्याने नवीन मोजणी कामी येणारा खर्च त्यांच्या वेतनातून वसूल करुन मोजणी अधिका-याकडे भरणा करण्यात यावा अशी मागणी केली. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिका-यांनी श्रीमती.घोडींदे कोणत्या कालावधीत प्रधान सचिव यांच्या कार्यालयात कार्यरत होत्या याबाबत माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. जन माहिती अधिका-याने अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२८.०७.२००९ रोजी आदेश पारित

करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउप अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्रीमती. विद्या घोंडिदे, लघुटंकलेखिका, महसूल व वन विभाग यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी. झालेल्या खर्चाबाबत भरपाई मिळावी अशी अपीलकाराने व्दितीय अपीलात मागणी केली आहे. श्रीमती. घोडींदे यांच्याविरुध्द कारवाई करण्याची अपीलकाराची मागणी माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाही असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेले आदेश बरोबर आहेत. श्रीमती.विद्या घोडिंदे, लघुटंकलेखिक, महसूल व वन विभाग यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी अशी अपीलकाराने व्दितीय अपीलात मागणी केली आहे. सदर बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मधील माहितीच्या व्याख्येत येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २६.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३७४/०२**

**श्री. अरविंद तिवारी**
**खो.क्र.२ अमर बहादूर चाळ, साईबाबा रोड,**
**जवाहर नगर, खार (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**परि-९, हिल रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**पश्चिम नियंत्रण कक्ष, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अरविंद तिवारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खेरवाडी पोलीस ठाण्यात श्री.सुजान एच.मांजरेकर, श्रीमती.सुचिता एस.मांजरेकर, श्रीमती.राजश्री मांजरेकर यांच्याविरूध्द दि.०२.१२.२००८ आणि दि.१०.१२.२००८ रोजी दाखल केलेल्या एन.सी.च्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०२.२००९ च्या पत्रान्वये माहिती नाकारली. दिशाभूल करणारी माहिती दिली माहिती नाकारली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०१.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी दि.१६.०४.२००९ रोजी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी, अपीलकारास समाधानकारक उत्तर दिले असल्याचे नमुद करुन दि.१७.०४.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, खेरवाडी पोलीस, ठाणे मुंबई येथे दि.०२.१२.२००८ व दि.१०.१२.२००८ रोजी श्री.सुजन

मांजरेकर, श्रीमती.सुचिता व श्रीमती.राजश्री मांजरेकर यांच्या विरुध्द नोंदविण्यात आलेल्या अदरवलपात्र गुन्हयाची प्रत मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची आहे. अदरवलपात्र गुन्हयाच्या प्रतीबाबत गुन्हयातील फिर्यादी यांना विचारणा केली असता त्यांनी अदरवलपात्र गुन्हा नोंदीच्या प्रती देण्यास सक्त हरकत घेतली. म्हणून अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३५९/०२**

**श्री. गुलाम मो अब्दूल अजिज बनानी**
**तबेलाला नं.८११/२, कलेक्टर चाळ,**
**यु.पी.रेस्टोरेंटच्या मागे, चिरागनगर,**
**घाटकोपर (प), मुंबई ४०० ०८६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी**
**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**बांद्रा, मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी**
**(निवडणूक कार्यालय शाखा), मुंबई उपनगर जिल्हा,**
**प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.गुलाम मोहम्मद अब्दूल अजीज बनानी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०३.२००९ रोजी अर्ज करुन, सन १९९९ आणि २००४ या वर्षाच्या निवडणूकीमध्ये श्री.अरीफ नसीम खान यांनी स्वत:ची संपत्ती किती जाहिर केली होती. निवडणूकीचा फॉर्म भरला त्याची प्रत, श्री.खान यांचे शिक्षण किती त्याची संपूर्ण सविस्तर माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती (१) http://www.mumbai.gov.in व २) http://www.mumbaisuburban.govt.in) या संकेत स्थळावरुन माहिती प्राप्त करून घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करून आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.अरीफ नसीम खान यांचेबाबत संपत्ती, शिक्षण इत्यादी सविस्तर माहिती मागीतली होती. संकेत स्थळाचा पता देउन संकेतस्थळावरुन माहिती प्राप्त करुन द्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास कळविले होते. तरी अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. माहिती मिळाली नसल्याच्या करणावरुन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता उत्तरवादी अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २६.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३७६/०२**

**श्री. चद्रकांत मर्चंट**
**जे.एम.राणे बिल्डींग व खंवाटा पठाण चाळ,**
**डॉ.ई मोझेस रोड, वरळी,**
**मुंबई ४०० ०१८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रमुख्र अग्निशमन अधिकारी**
**अग्निशमन विभाग, ई वॉर्ड म्युनिसिपल कार्यालय,**
**डॉ.मोझेस रोउ, वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख्र अग्निशमन अधिकारी**
**अग्निशमन विभाग, ई वॉर्ड म्युनिसिपल कार्यालय,**
**डॉ.मोझेस रोउ, वरळी, मुंबई ४०० ०१८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. चंद्रकांत मर्चंट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खैबर मालमत्ता-लोअरपरेल डिव्हीजन सीटी सर्व्हे क्र.११२/११३ प्लॉट १५३ डॉ.ई मोझेस रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८ येथील बहुमजली वास्तू उभारणीसाठी अग्निशमन दल चीफ ऑफीसर यांनी दि.०३.०७.१९९७ रोजी संदर्भ क्र.एफबीएम/५९७/१५५ या समक्रमांकाचे विकासकास पत्र सुपूर्द केले त्यासंबंधीच्या पत्राच्या प्रतीची मागणी केली होती. फाईलचा कसून शोध घेतला असता ती सापडू शकली नाही. ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्याकरिता कार्यकारी अभियंता, इमारत व प्रस्ताव (शहर) ई विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी दि.१३.०५.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१७.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. कार्यालयाची कागदपत्र भायखळा आणि मरोळ (पूर्व उपनगर आणि पश्चिम उपनगर) या कार्यालयात विभागणी झाली. यामुळे सद्यस्थितीत अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र सापडत नाहीत. संबंधीत फाईल सापडताच लवकरात लवकर अपीलकारास छायाप्रत देण्यात येईल असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी

अपीलकारास दि.०७.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, बहुमजली इमारत उभारणीकरिता अग्निशमन दलाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची फाईल Misplaced झाली आहे. संबंधीत फाईल सापडल्यानंतर अपीलकारास लवकरात लवकर माहिती पुरविण्यात येईल असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झ्ााल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २६.१०.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३३२/०२**

**श्री. खुर्शिद वझीर अहमद**
**ओम साई दर्शन को.ऑ.हौ.सो.**
**सी.टी.एस. नं.५१२, जुन्नेर नगर,**
**सी.डी.बर्फीवाला रोड,**
**जुहू लेन, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी**
**७ वा मजला, प्रशासकीय इमारत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नायाब तहसिलदार**
**७ वा मजला, प्रशासकीय इमारत,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. खुर्शिद वझीर अहमद यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.१२.२००८ रोजी अर्ज करुन, सी.टी.सर्व्हे क्र.५१२ जुन्नेर नगर, जुहू लेन सी.डी.बर्फीवाला रोड, अंधेरी (प), मुंबई येथील पुनर्वसन प्रकल्पात सदनिका वाटपाकरिता परिशिष्ट-२ मधील खाली नमुद पात्र लाभधारकांनी पुरावा म्हणून सादर केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती.

| अ.क्र. | नाव | अ.क्र. | नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री.पटेल महमद हासन आणि | १०३ | श्री.अजीज अहमद गुलाम अहमद |
| ५८ | श्री.रफीक शेख | ११८ | श्री.मोहम्मद रफीक अब्दूल नबी |
| ७६ | श्री.उमर शेख | १३२ | श्री.अब्दूल रशिद |
| ८० | श्रीमती.अजीबाबी मोहमद | १३५ | श्री.जयशवार डी. कन्हाही |
| ८७ | श्रीमती.मुमताज गुलाम बेग | १३७ | श्रीमती.रशिदा शेख अब्दूल |
| ९९ | श्री.राम कवल भीम यादव | १३९ | श्रीमती.अमिना शेख |
| १०० | श्री.एस.एस.भीवानी | १४२ | श्रीमती.जमिला शेरखान |
| | श्री.नसीम जनील | | |

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास संबंधीत संचिका तपासणीकरिता जन माहिती अधिका-यांनी

उपलब्ध करुन द्यावी. अपीलकाराने संचिकेची तपासणी करावी. त्यानंतर मागणीनुसार अपीलकारास कागदपत्राच्या छायाप्रती द्याव्यात असे दि.२६.०३.२००९ रोजी आदेश पारित केले. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पुनर्वसन प्रस्तावातील परिशिष्ट-२ मधील पात्र लाभार्थ्यांनी पुराव्या दाखल दिलेल्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. अपीलकारास संबंधीत कागदपत्र तपासणीसाठी प्रथम उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर निवडक कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास द्याव्यात असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांना आदेश दिले आहेत. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर प्रकरणी योग्यते आदेश पारित केले आहेत. जन माहिती अधिका-यांनी सदर आदेशाचे पालन केलेले नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. अन्यथा उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई करण्यात येईल.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २९.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३०६७/०२**

**श्री. राजेंद्र राधाकृष्ण मुंणनकर**
**एम.आय.डी.सी. कर्मचारी संघटना**
**ओंमकारचाळ, चदेंणी कोळीवाडा,**
**मिठाबंदर रोड, बालाजी मेडीकल स्टोअर्स जवळ,**
**ठाणे (पू) ४०० ६०३.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह मुख्य लेखा अधिकारी**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,**
**उद्योग सारर्थी महाकाली गुफा मार्ग,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य लेखा अधिकारी**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,**
**उद्योग सारर्थी महाकाली गुफा मार्ग,**
**अंधेरी (पू), मुंबई ४०० ०९३.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. राजेंद्र मुणनंकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.११.२००८ रोजी अर्ज करुन, दि.११.०७.२००८ रोजी ठाणे विभाग क्र.१ मधील सौ.पोतदार यांच्या तक्रारीवरुन प्राथमिक चौकशी करण्यात आली याबाबत एकूण ५ मुद्यावर माहिती मागीतली होती. कार्यवाही पूर्ण झाली नसल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.०१.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, ठाणे विभाग क्र.१ मधील सौ.पोतदार यांनी दि.११.०७.२००८ रोजी केलेल्या तक्रारीबाबत अपीलकाराने माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम ८(१) (त्र) अनुसार सदर कार्यवाही पूर्ण झाली नसल्याने माहिती नाकारली. सदर प्रकरणी अपीलकाराने सौ.पोतदार यांनी केलेल्या तक्रारीसंबंधी माहिती मागीतली आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, त्रयस्थ पक्षाची माहिती मागीतली आहे. तेव्हा जन माहिती अधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ अनुसार कार्यपध्दतीचा अवलंब करावा. त्यानंतर अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २८.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२९३४/०२**

**श्री. प्रभाकर गोपाळ वैशंपायन**
**श्रीमती मेघा जोशी, सी-१०१,**
**प्रशाल सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**संत जनाबाई रोड, विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा आयुक्त (मालमत्ताृ**
**बृहन्मुंबई महानगरपालिका (मालमत्ता)**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्केट बिल्डींग,**
**फलटन रोड, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशाकीय अधिकारी (मालमत्ता)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका (मालमत्ता)**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्केट बिल्डींग,**
**फलटन रोड, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. प्रभाकर वैशंपायन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.१२.२००७ रोजी अर्ज करुन, म.न.पा.प्लॉट सर्व्हे क्र.४२६-अे, वाकोला, नेहरू रोड, सांताक्रुझ (पू) (म.न.पा.एच/पूर्व विभाग) येथील जोगीया सहकारी गृहनिर्माण संस्था या म.न.पा. कर्मचा-यांच्या संस्थेतील सदनिका क्र.अे/१२१ हस्तांतरित करण्यास परवानगी मागीतली असल्याबाबत एकूण २१ मुद्यावर माहिती मागीतली. कार्यालयातील सर्व संबंधीत फाईल/कागदपत्राची तपासणी करावी. त्यानंतर मागणीनुसार आवश्यक कागदपत्राच्या प्रती पुरविण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते. अपीलकार कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. अपीलकारानी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार सुनावणीकरिता उपस्थित राहीले नाहीत. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०५.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, म.न.पा.च्या जागेतील, म.न.पा. कर्मचा-यांच्या जोगीया सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिका क्र.अे/१२१, म.न.पा.चा कर्मचारी नसलेल्या व्यक्तीस हसतांतरित करण्यास मागीतलेल्या परवानगी संबंधी अनुषंगीक एकूण २१ मुद्यावर माहिती मागीतली होती. अपीलकारास हवी असलेली माहिती पुरविण्याच्या दृष्टीने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत फाईल / कागदपत्राचे निरीक्षण करावे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते. अपीलकार संबंधीत कागदपत्राच्या निरीक्षणाकरिता कार्यालयात उपस्थित राहिले नाही. प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता उपस्थित राहीले नाहीत. माहितीपोटी रु.११४/- (५७ प्रती) व पोच देय टपालासाठी रु.८०/- इतका टपाल खर्च अपीलकाराने म.न.पा. कार्यालयात भरावा. त्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असेही जन माहिती अधिका-यांनी दि.२८.०७.२००९ रोजी आयोगास दिलेल्या अहवालात नमुद केले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. तरी अपीलकाराने जन माहिती अधिका-यांशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक २८.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२९७३/०२**

**श्री. निपुण मठकर**
**बी-५, जिवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजय नगर,**
**नाला सोपारा (पू),**
**ठाणे ४०१ २०८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग का-६,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग का-६,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निपुण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०१.२००९ रोजी अर्ज करुन, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५ अनुसार व्यवहार्य असेल तितक्या लवकर, प्रत्येक वर्ष समाप्त इ ााल्यावर या अधिनियमाच्या तरतुदीच्या त्या वर्षातील अमलबजावणीबाबतचा अहवाल तयार करील व त्याची एक प्रत समुचित शासनाला पाठविले. प्रत्येक मंत्रालयीन विभाग त्याच्या अधिकारीतेतील सार्वजनिक प्राधिकरणासंबंधी माहिती गोळा करील आणि या कलमान्वये अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असेल अशी माहिती राज्य माहिती आयोगास देईल अशी तरतूद आह. यानुसार राज्यातील एकूण कार्यालयाची संस्था, अधिकारी, कर्मचारी, सरकारी नोकर, जन माहिती अधिकारी, सार्वजनिक प्राधिकरण, अपिलीय प्राधिकारी, सचिव, माहिती आयुक्त, मुख्य माहिती आयुक्त, सक्षम प्राधिकारी यांची एकूण संख्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५ ची अमलबजावणी करणा-या वर नमुद सर्व अधिकारी कर्मचा-यांची एकूण संख्या इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालवधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०५.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५ ची अमंलबजावणी करणारे सर्व संबंधीत अधिकारी, कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, सक्षम अधिकारी, सरकारी नोकर इत्यादीची एकूण संख्या इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित वेळेत माहिती दिलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २८.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३४७/०२**

**श्री. आलवेयन रीबेरो**
**३४/१२, सहकार नगर,**
**वडाळा, मुंबई ४०० ०३१.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**तहसिलदार अंधेरी,**
**नवरंग सिनेमा जवळ,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार अंधेरी,**
**नवरंग सिनेमा जवळ,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. आलवेयन रीबेरो यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०४.२००९ रोजी अर्ज करुन, श्रीमती. जेसी फरान्सीस यांची सी.टी.सर्व्हे क्र. एफ-१९६ बांद्रा गाव ता.अंधेरी येथील क्षेत्रफळ २७५.९० चौ.मी.जमिनीसंबंधी एकूण ३ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सी.टी.सर्व्हे क्र.एफ-१९६ बांद्रागांव ता.अंधेरी येथील जमिनी बाबत अनुषंगीक माहिती

मागीतली होती.  जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती दिली नाही.  जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २८.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३४६/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे**
**२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई ४०० ०१९. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता**
**(इमारत प्रस्ताव) महानगरपालिका, ई विभाग,**
**भायखळा, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**(इमारत प्रस्ताव) महानगरपालिका, ई विभाग,**
**भायखळा, मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रकाश नवाथे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०२.२००९ रोजी अर्ज करुन, २०४ राजबाग भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई येथील सदर गृहनिर्माण संस्थे लगत साठ-सत्तर चौ.फु. मोकळी जागा आहे. सदर जागेवर कबुतराचे थवे येउन बसतात. त्याठीकाणी कबुतराची विष्ठा साचत असते. त्यामुळे दुर्गंधी पसरते. डासांचा प्रादूर्भाव होतो. सदर परिस्थिती अपीलकाराच्या कुटुंबाच्या आरोग्याला हानीकारक आहे. सदर जागेवर जाण्यासाठी मंजूर प्लॉन मध्ये कोणता मार्ग दाखवला आहे. याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०७.०३.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले. जन माहिती अधिका-यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.३०.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कावळे, कबुतराच्या विष्ठेमुळे डासांचा प्रादूर्भाव, आरोग्यास हानीकारक. सदर ठीकाणी जाण्यासाठी मार्ग याबाबत अपीलकाराने माहिती मागीतली होती. अपीलकाराने अपेक्षीलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) माहिती या संज्ञेमध्ये बसत नाही. इमारतीची, इमारत परिसराची स्वच्छता ही संस्थेची अंतर्गत बाब असल्यामुळे हा प्रश्न संस्था सोडवू शकते. आरोग्याच्या प्रश्नासंबंधी आरोग्य विभागाशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढयात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २९.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८९३/०२**

**श्री. इ.अे.मेंडीस**
**१०७, निभाना पाली हिल,**
**बांद्रा, मुंबई ४०० ०५०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उप निबंधक, सहकारी संस्था,**
**एच/पश्चिम वार्ड,**
**बांद्रा, मुंबई ४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी,**
**उप निबंधक, सहकारी संस्था,**
**एच/पश्चिम वार्ड,**
**बांद्रा, मुंबई ४०० ०५०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. इ.अे.मेंडीस यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.११.२००७ रोजी अर्ज करुन, निभाना सहकारी गृहनिर्माण संस्था लि. नर्गिस दत्त रोड, बांद्रा (प), मुंबई या संस्थेने दि.२५.०३.१९९३ च्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर केलेल्या ठरावानुसार करण्यात आलेल्या इमारत दुरुस्ती कामामध्ये तात्कालीन व्यवस्थापक समितीने वेळोवेळी अवलंबीलेल्या पध्दतीमुळे संस्थेचे आर्थिक नुकसान झाले किंवा कसे याबाबत चौकशी करण्यासाठी श्री.पी.टी.मलेवार, सहा.निबंधक सलंग्न विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था मुंबई यांचे उपनिबंधक सहकारी संस्था यांना दि.०१.०८.२००३ च्या आदेशान्वये नेमणूक केली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०५.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, निभाना सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या दुरुस्तीकरिता रु.१, २०, ८४, ६६०/- एवढया रक्कमेचे काम तात्कालीन व्यवस्थापन समितीने मेसर्स मात्कन कन्ट्रक्शन प्रा.लि.यांना दिले होते. संस्थेच्या दि.२५.०३.९३ च्या सर्वसाधारण सभेमध्ये केलेल्या ठरावानुसार सदर कामात संस्थेचे आर्थिक नुकसान झाले किंवा कसे याबाबत चौकशी करण्याकरिता उपनिबंधक सहकारी संस्था यांनी श्री.पी.टी.मलेवार, सहा.निबंधक सलग्न विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांची दि.०१.०८.२००३ च्या आदेशान्वये नेमणू केली होती. सदर चौकशी अधिका-याचा कालावधी वाढविण्यात आला होता किंवा कसे याबाबत अपीलकाराने माहिती मागीतली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी याबाबत कार्यालयातील सर्व संबंधीत कागदपत्राची तपासणी करावी व अपीलकाराने मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक २८.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३०८१/०२**

**श्री. निपुण मठकर**
**बी-५, जिवदानी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजय नगर,**
**नाला सोपारा (पू),**
**ठाणे ४०१ २०८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निपुण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५ अनुसार व्यवहार्य असेल तितक्या लवकर, प्रत्येक वर्ष समाप्त झाल्यावर या अधिनियमाच्या तरतुदीच्या त्या वर्षातील अमलबजावणीबाबतचा अहवाल तयार करील व त्याची एक प्रत समुचित शासनाला पाठविले. प्रत्येक मंत्रालयीन विभाग त्याच्या अधिकारीतेतील सार्वजनिक प्राधिकरणासंबंधी माहिती गोळा करील आणि या कलमान्वये अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असेल अशी माहिती राज्य माहिती आयोगास देईल अशी तरतूद आहे. यानुसार भारतीय नागरिकांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाविरूध्द मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणाबाबतची माहिती व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालवधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, भारतीय नागरिकांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणाबाबतची व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील दोन कार्यासनातील अधिका-यांनी संबंधित मुद्यांची माहिती दिली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४५८/०२**

**श्री. दिनेश महादेव तारकर**
**भिवराबाई भोसले चाळ नं.३,**
**रुम नं.१६, बालगोविंदास रोड,**
**दादर, मुंबई ४०० ०२८.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता**
**इमारत प्रस्ताव विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.दिनेश तारकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.११.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते.

तक्रारदाराने, गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन, जय हनुमान सहकारी गृहनिर्माण संस्था लि. (प्रस्तावीत) माहिम, मुंबई या संस्थेच्या पुनर्वीकास प्रस्तावास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मान्यता दिली आहे का याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे क्र.२००८/९४६/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने समाधानकारक आयोगास उत्तर दिले नसल्याने तक्रारदारास मागणीप्रमाणे १५ दिवसात माहिती द्यावी. तसेच गैरतक्रारदाराविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार दंडात्मक कारवाई का करु नये याबाबत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा असे दि.०३.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही तक्रारदारास गैरतक्रारदारांनी काही उत्तर दिले नसल्याच्या कारणावरुन आयोगाकडे क्र.४५८/०२ ही तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरिता दि.३०.१०.२००९ रोजी हजर होते. तक्रारदारास दि.०७.०८००९, २९.०९.२००९ रोजी माहिती दिली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी दि.३०.१०.२००९ रोजी आयोगास लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४५७/०२**

**श्री. मोफिद अहमद खॉन**
**रूम नं.९ डेडिया निवास रफी अहमद किदवाई रोड,**
**वडाला, मुबई ४०० ०३१. .... अपीलकार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**शिधावाटप कार्यालय,**
**नं.३१ ई, माटुंगा, किंग सर्कल,**
**मुंबई ४०० ००४. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.मोफीद खॉन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करून रफी अहमद किडवई रोड, वडाळा प्रबुध्द नगर झोपडपट्टीतील शिधापत्रिका धारकाच्या नोंदीच्या दि.३१.१२.१९९४ च्या सूचीची प्रत मागीतली होती. माहितीपोटी रु.५००/- एवढे शुल्क भरणा करण्याबाबत गैरतक्रारदारांनी तक्रारदारास कळवले. गैरतक्रारदाराने चुकीची माहिती दिली. म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. त्यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.अपील २००९/१९९०/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी ४५ दिवसाचे आत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करून अपीलावर निर्णय घ्यावा असे आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. परंतू माहिती दिली नाही. यामुळे तक्रारदाराने आयोगाकडे क्र.४५७/०२ तक्रार दाखल केली.

तक्रारदारास, गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती दिली नाही. चुकीची माहिती दिली असल्याचे सुनावणीचेवेळी तक्रारदाराने प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने, तक्रारदारास हवी असलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

तक्रार मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक ३१.१०.२००९

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४५९/०२**

**श्री. दिनेश महादेव तारकर**
**भिवराबाई भोसले चाळ नं.३,**
**रुम नं.१६, बालगोविंदास रोड,**
**दादर, मुंबई ४०० ०२८.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी,**
**धारावी विभाग, जिल्हाधिकारी (शहर) यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई ४०० ००१** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.दिनेश तारकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.

तक्रारदाराने, गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण्याच्या योजनेतंर्गत माहिम विभागातील प्रस्तावित जय हनुमान सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/२०६६/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने काढलेल्या अधिसूचनेची (Notification) प्रत तक्रारदारास द्यावी असे दि.१६.०३.२००९ रोजी आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतर आद्याप माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदारांनी असे प्रतिपादन केले की, आयोगाच्या आदेशानुसार नोटीफीकेशनची प्रत अपीलकारास देण्यात आली आहे. यापुष्ठयार्थ अपीलकारास माहिती पुरविली असल्याची पोच पावती आयोगाच्या निदर्शनास आणली. तक्रारीवरील

सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते.  सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले असल्याचे सिध्द होते.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

(रामानंद तिवारी)
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४६०/०२**

**श्री. चंद्रकांत बंड**
**४ अे/१४ बुधरगड,**
**आर.टी.ओ.जवळ, चार बंगलो**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड**
**इडियन मर्कंटाईल चेंबर,**
**३ रा मजला, रामजीभाई कमानी मार्ग,**
**बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.चंद्रकांत बंड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेगाकडे दि.०७.०८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.१०.२००९ रोजी सुनावणी आयेजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.

तक्रारदाराने, गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करून, मेरीटाइम बोर्ड, मुंबई बाबत विविध विषयावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरअर्जदाराने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/१८३७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी दि.१६.०४.२००९ रोजी सुनावणी घेउन तक्रारदारास अर्जातील मुध्दा क्र.१, २, ५, ७, ८, ९, १० आणि १३ बाबत ३० दिवसाचे आत माहिती द्यावी असे आदेश दि.१६.०४.२००९ रोजी पारित केले होते. त्यानंतरही माहिती दिली नसल्याने तक्रारदाराने दि.०६.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार क्र.४६०/०२ दाखल केली.

तक्रारीवरील दि.३०.१०.२००९ रोजीच्या सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी हजर होते. तक्रारदारास दि.२८.१०.२००९ रोजी टपालाव्दारे माहिती पाठविली असल्याचे लेखी अहवाल आयोगास सादर करून प्रतिपादन केले. तक्रारदारास माहिती पुरविण्यास अनावधानाने विलंब झाला असल्याने सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगास क्षमा याचना केली. या

परिस्थितीत मी असे आदेश देतो की, भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी या उभयतांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/३१९/०२**

**श्री.विशाल रामदास भोगे**
**गाळा क्र.९ इमारत क्र.९०, न्यू म्हाडा कॉलनी,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,**
**मानखुर्द, मुंबई ४०० ०४३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एम/पूर्व विभाग,**
**२ रा मजला, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.विशाल भोगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२०.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी तक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने, गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करून, मोहिते पाटील नगर येथील अनधीकृत बांधकामाबाबत केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे तक्रारदाराने क्र.२००८/१२७३/०२ हे व्दितीय अपील दाखल केले. तक्रारदारास सदर प्रकरणी ३० दिवसाचे आत माहिती द्यावी असे आयोगाने दि.२७.११.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरिता गैरतक्रारदारास अनुपस्थित होते. सदर प्रकरणी गैरतक्रारदारांनी जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्तीची कारवाई का करु नये याबाबत खुलासा मागविण्यात आला आहे. गैरतक्रारदाराने दि.०३.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे खुलासा सादर केला आहे. तक्रारीवरील सुनावणीची नोटीस विभागास प्राप्त झाले नसल्यामुळे गैरतक्रारदारास सुनावणीकरिता उपस्थित राहता आले नाही.

अपील क्र.२००८/१२७३/०२ संबंधीच्या आदेशाची प्रत प्राप्त होताच तक्रारदारास, गैरतक्रारदार तथा सहाय्यक अभियंता (ई व का) एम/पूर्व यांनी क्र.स.आ./एम/पूर्व/७२०४७८२३३/स.आ.ई. व का. दि.३१.०१.२००९ च्या पत्रान्वये अन्वये तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचा गैरतक्रारदारांनी आयोगाकडे लेखी खुलासा सादर केला आहे. तक्रारदारास पाठविलेल्या दि.३१.०१.२००९ च्या पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरून आयोगाने अपील क्र.२००८/१२७३/०२ या प्रकरणी पारित केलेल्या आदेशाचे गैरतक्रारदारांनी पालन केले आहे. तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत सदर तक्रारी संबंधी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४३९/०२**

**श्री. पी.पी.तलाठी**
**अदरबाद, फ्लॅट क्र.४३,**
**३४, एन.एस.पाटकर मार्ग,**
**मुंबई ४०० ००७.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक**
**सहकारी संस्था डी विभाग,**
**सहकारी संस्था, मल्होत्रा हाउस,**
**६ वा मजला, जीपीओच्या समोर, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.पी.पी.तलाठी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन अदरबाद सहकारी गृहनिर्माण संस्थेसंबंधीची एकूण ५ मुद्यावर माहिती मागीतली होती. गैरतक्रारदारांनी तक्रारदारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिली. उर्वरित माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेउन देण्यात येईल असे कळविले होते. गैरतक्रारदारांनी संस्थेकडून माहिती प्राप्त करुन तक्रारदारास पुरवावी असे क्र.६५९/०२ च्या व्दितीय अपीलावर दि.१४.०८.२००८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याच्या कारणावर तक्रारदाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १८ अन्वये दि.३१.१०.२००८ रोजी आयोगाकडे क्र.४३९/०२ ही तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२५.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार अनुपस्थित होते.

राज्य माहिती आयोगाच्या दि.१४.०८.२००८ च्या आदेशानुसार तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयोगाचे आदेश आहेत. सदर आदेशानुसार गैरतक्रारदाराने अपीलकारास माहिती पुरविली नाही. यासाठी गैरतक्रारदारास जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये शास्ती लादण्याची कारवाई का करु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस दि.१६.१०.२००९ रोजी पाठवून खुलासा मागविण्यात आला आहे. गैरतक्रारदाराने खालीलप्रमाणे दि.२८.१०.२००९ च्या पत्रान्वये खुलासा केला आहे.

"आयोगाने तक्रारदाराच्या क्र.४३९/०२ या तक्रारीवरील सुनावणी दरम्यान दिलेल्या सूचनानुसार संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेउन तक्रारदारास खास दुतामार्फत दि.०५.१०.२००९ रोजी पाठविली. तक्रारदाराने माहिती घेतली नाही. नाकारली. तक्रारदार दि.०६.१०.२००९ रोजी कार्यालयात प्रत्यक्ष हजर झाले व त्यांनी माहिती स्विकारली. त्यामुळे दि.१४.०८.२००८ च्या आदेशाचे अनुपालन केले आहे. तक्रारदारास माहिती पुरविली आहे." सदर लेखी खुलासा मान्य करावा अशी गैरतक्रारदाराने क्षमा याचना केली आहे.

गैरतक्रारदाराने कारणे दाखवा नोटीसला अनुसरुन सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले. गैरतक्रारदाराने संस्थेकडून माहिती प्राप्त करुन तक्रारदारास दि.०६.१०.२००९ रोजी अ,ब,क,ड व ई या सर्व मुद्याबाबत माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत सदर तक्रारी संबंधी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४४७/०२**

**श्री. शेख नसीबुल्लाह**
**रूम नं.१, मझांर चाळ,**
**हरी मस्जित मोती कम्पाउंड,**
**घाडूपदेव, मुंबई ४०० ०१०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी**
**(सा.प्र.) मुंबई शहर, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,**
**मुंबई शहर, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,**
**मुंबई शहर, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. शेख नसीबुल्लाह यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०६.२००९ अर्ज करून, इतर मागास वर्गाचे जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अवलंबावयाची कार्यपध्दती इतर राज्यातील व्यक्तीस महाराष्ट्र राज्यात इतर मागास वर्गाचे जाती प्रमाणपत्र मिळण्यास तो पात्र आहे का? महाराष्ट्र राज्यात ३० वर्षापासून वास्तव्य आहे. इतर राज्यातील इतर मागास वर्ग जातीप्रमाणपत्र धारण केले आहे. अशा व्यक्तीच्या महाराष्ट्रात जन्म झालेल्या मुला/मुलीस महाराष्ट्रात इतर मागास वर्गाचे जाती प्रमाणपत्र मिळण्यास ते पात्र आहेत का? इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२०.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, इतर मागास वर्ग जाती प्रमाणपत्र मिळण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त इ ााल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी भविष्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार केलेल्या अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४४८/०२**

**श्री.गोपालन अडापट्टी चक्कन**
**फ्लॅट नं.२०२, इमारत क्र.१, सी विंग,**
**नेबरहुड को.ऑप.हो.सोसायटी लि.,**
**लोखंडवाला टाउंनशिप, आकुर्ली रोड,**
**कांदिवली (पू), मुंबई ४०० १०१. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाउपनिबंधक**
**सहकारी संस्था (३), मुंबई यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण भवन, तळ मजला, कक्ष क्र.६९,**
**बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक / विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई मल्होत्रा होउस,**
**६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. गोपालन अडापट्टी चक्कन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०१.२००९ अर्ज करुन, नेबरहुड सहकारी गृहनिर्माण संस्था लि. कांदिवली (पू) मुंबई या संस्थेच्या मुख्य प्रवर्तकांनी संस्था नोंदणीसाठी सादर केलेल्या अर्जाची साक्षांकित प्रत मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, नेबरहुड सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४९२/०२**

**श्री. हरिष चंदू बडेकर**
**६०४/७, तोजेमय सह.गृ संस्था,**
**सेक्टर क्र.३, चारकोप, कांदिवली, मुंबई ४०० ०६७. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हरिष चंदू बडेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०३.२००९ अर्ज करुन,

१. आपले विभागातील कोणत्याही माध्यमाशिवाय थेट नियुक्ती झालेले आयोग अनुरस्कृत कर्मचा-यांची नावे, नियुक्ती दिनांक, विभागीय परिक्षा पास झाल्याचा दिनांक, कालबध्द पदोन्नती दिल्याचा दिनांक देण्यात यावा.

२. शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही १०९७/प्र.क्र.४/९७/१२/, दि.१२.०८.१९९७ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील अनियमित नियुक्त्याबाबत शासनास परिशिष्ट अ मध्ये माहिती पाठविलेली असल्यास अ च्या झेरॉक्स प्रति.

३. Original application No.७६१/२००७] ०४/२००८, ६८१/२००८ and ६८८/२००८ dt.१९/१२/२००८ प्रमाणे महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणाच्या निकालाप्रमाणे कर्मचा-यानी कालबध्द पदोन्नती मिळावी म्हणून अर्ज केले असल्यास कर्मचा-यांनी नावे तसेच त्याची नावे सेवा जेष्ठता सुची उपलब्ध असलेबाबत/नसणेबाबत तपशील देण्यात यावा. तसचे अर्जावरील कार्यवाहीबाबत तपशील देण्यात यावा.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०६.०४.२००९ रोजी पत्र पाठवून संबंधीत विभाग प्रमुख, विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दि.०४.०५.२००९ रोजी दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२९.०६.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळेले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२९.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महसूल व वन विभागात कोणत्याही माद्यमाशिवाय थेट नियुक्त झालेले आयोग अपुरस्कृतांची नावे, नियुक्ती दिनांक, विभागीय परीक्षा पास झाल्याचा दिनांक, कालबध्द पदोन्नती दिल्याचा दिनांक इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी खुध्द महसूल व वन विभागाची मंत्रालय स्तरावरची माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३५०/०२**

**श्री. अर्जुनलाल छाब्रिया**
**बेला विस्टा, फ्लॅट नं.१५,**
**तिसरा मजला, लेक व एल.आय.सी कार्यालयासमोर,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा संकलक व करनिर्धारक**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अर्जुनलाल छाब्रिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०४.२००८ अर्ज करुन, क्र.के डब्ल्यू ५५११ (के-६) आणि आकाउंट नं. १५१४११०८९०००० दु.क्र.०४ हीलटंन सहकारी गृहनिर्माण संस्था शास्तीनगर येथील महालमत्तेबाबत महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम १६७ अनुसार निर्गमित केलेल्या विशेष नोटीसबाबत एकूण ५ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, क्र.के डब्ल्यू ५५११ (के-६) आणि आकाउंट नं.१५१४११०८९०००० या मालमत्तेबाबत कलम १६७ अनुसार निर्गमित करण्यात आलेल्या विशेष नोटीसीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४८८/०२**

**श्री. हरिष चंदू बडेकर**
**६०४/७, तोजेमय सह.गृ संस्था,**
**सेक्टर क्र.३, चारकोप, कांदिवली, मुंबई ४०० ०६७. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रबंधक**
**महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण**
**शासकीय कुटीर क्र.३ व ४,**
**फ्री प्रेस जनरल मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०२१.**

**जन माहिती अधिकारी**
**महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण**
**शासकीय कुटीर क्र.३ व ४,**
**फ्री प्रेस जनरल मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०२१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. हरिष चंदू बडेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०३.२००९ अर्ज करुन, १) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे कडील अर्ज क्र.७८२/२००३ दि.१३.०२.२००४ प्रमाणे १४.०७.७१ ते दि.०५.०९.२००० या कालावधीचे सेवानिवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन कोणत्या शासकीय नियमाच्या आधारे मंजुर करण्यात आले नाही त्या शासकीय नियमांच्या झेरॉक्स प्रती (संदर्भ महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेन नियम १९२) २) या महाराष्ट्र शासकीय न्यायाधिकरणाने अर्ज क्र.७८२/२००३ दि.१३.०२.२००४ प्रमाणे फक्त ०६.०९.२००० नंतर कुटुंबनिवृत्ती वेतन मंजुर केले आहे परंतु शासनाने ०६.०९.२००० पुर्वीचे निवृत्तीवेतन / कुटुंबनिवृत्तीवेतन मंजुर करता येणार नाही याबाबत आपले आदेश असल्यास अशा आदेशाच्या झेरॉक्स प्रती. ३) अर्ज क्र.७८२/२००३ दि.१३.०२.२००४ च्या निकालामध्ये अनुक्रमांक १० मध्ये श्री मयत चंदु रामा बडेकर यांची १३ वर्ष ६ महिने अर्हताकारी सेवा मान्य करुन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील कोणत्या तरतुदी नुसार ०६.०९.२००० नंतरचे कुटंब निवृत्ती वेतन मंजूर केले त्या नियमाच्या झेरॉक्स प्रती इत्यादी माहिती मागीतली होती.

अर्जातील मुध्दा क्र.१ अनुसार मागणी केलेल्या दि.१४.०७.१९७१ ते ०५.०९.२००० या कालावधीचे सेवानिवृत्ती वेतनविषयी प्रकरण कोर्टात दाखल करुन विचारणा करु शकता.

अपीलकाराने मागणी केलेल्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेनाबाबतची माहिती वकीलाकडे किंवा संबंधीत कार्यालयात जाउन विचारणा करावी असे जन माहिती अधिका-यांनी दि.३१ मार्च, २००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२२.०५.२००९, दि.२४.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. दोन्ही दिवशी अपीलकार सुनावणीस अनुपस्थित होते. याकरणावरून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सेवानिवृत्त वेतनाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी दिलेल्या उत्तराने अपीलकाराचे समाधान झाले नाही. प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित राहिले नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील फेटाळले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४५९/०२**

**श्री. निशांत सु. घाडगे**
**२१ गोकुल डॉ.पेडणेकर बिल्डींग,**
**स.म.मार्ग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. अभियंता**
**(अनुज्ञापन) बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/दक्षिण विभाग कार्यालय, शालेय इमारत,**
**मिठा नगर, गोरेगांव (प), मुंबई ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी,**
**(अनुज्ञापन) बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पी/दक्षिण विभाग कार्यालय, शालेय इमारत,**
**मिठा नगर, गोरेगांव (प), मुंबई ४०० ०६२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निशांत घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, शाह इंटरप्रायझेस, ६९/७० न्यु अशोक नगर, कामा इस्टेट बलभट रोड, गोरेगाव रासायनिक (Liquied Chemicals) ची उत्पादन व साठा करण्या-या उत्पादकाच्या गोदामाची चौकशी करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दि.०७.०८.२००९ रोजी दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी दि.०९.१०.२००९ रोजी आयोजित केली. माहिती पुरविण्याबाबत आदेश पारित केले. माहिती मिळाली नाही यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, शाह इंटरप्रायझेस, ६९/७० न्यु अशोक नगर कामा इस्टेट बलकट रोड, गोरेगाव रासायनिक (liquid Chemical) ची उत्पादन व साठा करणा-या उत्पादकाच्या गोदामाची चौकशी करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१४.१०.२००९ रोजी माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलाच्या वेळी प्रतिपादन केले. तसेच अपीलकारास दिलेल्या उत्ताराची प्रत आयोगास सादर केली. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अनुपस्थित होते. गोदाम मालकास अनुज्ञापत्र दिलेले नाही. महानगरपालिका अधिनियम, ३९४/४७१ अन्वये मालकाविरुध्द न्यायालयीन खटला दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा कार्यालयीन अभिलेख प्रत्यक्ष कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकारास कळविले आहे. यावरुन सदर प्रकरणी कारवाई पूर्ण झाली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५५२/०२**

**श्री.मच्छिंद्र करळकर**
**हजाराबाई हाउस, रुम नं.५,**
**इर्ला सोसा रोड, विलेपार्ले (प),**
**मुंबई ४०० ०५६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पश्चिम विभागकार्यालय इमारत,**
**विरूध्द बेस्ट, एस.व्ही.रोड,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/पश्चिम विभागकार्यालय इमारत,**
**विरूध्द बेस्ट, एस.व्ही.रोड,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. निशांत घाडगे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०३.२००९ अर्ज करुन, इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प) मुंबई येथील होटल माया भवन स्प्रींग हाजारीबाई हाउस दुकानक्रमांक १ बाबत एकूण ११ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.०४.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरवावी असे दि.२२.०७.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यांनतर अपुरी माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, इर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले (प), मुंबई येथील होटल माया भवन स्प्रींग हाजारीबाई हाउस दुकान क्र.१ बाबत एकूण ११ मुद्यावर माहिती मागीतली होती. कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राची तपासणी करुन हव्या असलेल्या माहितीची निवड करावी. त्यानंतर आवश्यक माहितीच्या छायाप्रती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली होती. तसे अपीलकारास दि.०२.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत आदेश पारित केले होते. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अीलकारास सविस्तर माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता उपस्थित नव्हते. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५४३/०२**

**श्री.निपूण मठकर**
**ब-५, जिवदाणी कृपा चाळ,**
**रामचंद्र जाधववाडी, विजय नगर,**
**नाला सोपारा (पू), ठाणे ४०१ २०८. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**राज्यापालांचे सचिवांचे कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल,**
**मुंबई ४०० ०३५.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्यापालांचे सचिवांचे कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल,**
**मुंबई ४०० ०३५. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. निपूण मठकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०४.२००९ रोजी अर्ज करुन, माहितीच्या अधिकाराची अमंलबजावणी, महाराष्ट्र राज्य कार्य नियमावलीमधील तरतुद, संविधानामधील तरतुद, राज्य माहिती आयुक्त विषयक बाबी. तसचे शासकीय कर्मचा-यांचे कर्तव्य व जबाबदा-या महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीमधील तरतुदीविषयक शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाशी संबंधीत माहिती मागीलती होती. यामुळे जन माहिती अधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (३) अन्वये अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतरित केला. अपीलकारास तसे दि.४ मे, २००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२५.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता उपस्थित राहिले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१५.०७.२००९ रोजी तसे आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सामान्य प्रशासन विभागाशी संबंधीत माहिती मागीतली होती. यामुळे जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम ६(३) अनुसार अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतरित करुन त्या विभागाकडे परस्पर संपर्क साधण्याबाबत दि.०४.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. तसेच सदर उत्तराने समाधान झाले नाही तर सामान्य प्रशासन विभागातील प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील करण्याबाबत कळविले होते. परंतू अपीलकाराने प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सह सचिव, राज्यपाल सचिव कार्यालय, राजभवन, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५४८/०२**

**श्री. मनोहर स. देसाई**
**वरद लक्ष्मी, ४ था मजल,**
**रूम नं.४०६, गोखले मार्ग,**
**मुलुंड (पु), मुंबई ४०० ०८१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा**
**प्रमुख अभियंता (विकास नियोजन)**
**यांचे कार्यालय, ४ था मजला,**
**महापालिका मुख्य कार्यालय,**
**विस्तारित इमारत, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**प्रमुख अभियंता (विकास नियोजन)**
**यांचे कार्यालय, ४ था मजला,**
**महापालिका मुख्य कार्यालय,**
**विस्तारित इमारत, महापालिका मार्ग,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. मनोहर देसाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.०६.२००९ रोजी अर्ज करुन,

१) मुलुंड पूर्व येथिल न.भू.क्र.६५७ या भूखंडाचे मालक श्री.सिताराम बाबाजी सावंत यांची सन १९६८ साली गोपळ कृष्ण गोखले मार्गाच्या रस्तारुंदी करणासाठी किती जमिन संपादित करण्यात आली त्याबाबत मला संपूर्ण सविस्तर तपशीलवार माहिती देण्यात यावी.

२) मुलुंड पूर्व येथील न.भू.क्र.६५७ या भूखंडाचे मालक श्री.सिताराम बाबाजी सावंत यांची सन १९६८ साली गोपळ कृष्ण गोखले मार्गाच्या रस्तारुंदी करणासाठी संपादित केलेल्या

जमिनीच्या नुकसान भरपाईसाठी त्यांनी एफ.एस.आय किंवा रक्कमेसाठी दावा केला होता? व केव्हा केला होता? व त्यासाठी त्यांनी महानगरपालिकेस इमारतीचे नकाशे केव्हा सादर केले होते? व महानगरपालिकेच्या नियमानुसार एफ.एस.आय किंवा रक्कम श्री.सिताराम बाबाजी सावंत यांना केव्हा देण्यात आली? श्री.सिताराम बाबाजी सावंत यांनी एफ.एस.आय किंवा रक्कमेसाठी केलेल्या दाव्याबाबत व देण्यात आलेला एफ.एस.आय किंवा रक्कमेम बाबत मला संपूर्ण सविस्तर तपशीलवार माहिती देण्यात यावी.

कार्यालयातील संबंधीत दस्तऐवजाची तपासणी करावी त्यानंतर हव्या असलेल्या उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती तयार करुन योग्य ते शुल्क भरल्यानंतर प्रमाणित करुन देता येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.०७.२००९ रोजी कळविले. यामुळे समाधान इ ाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२५.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीस अनुपस्थित होते. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन दि.२८.०८.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०५.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मुलूंड (पू) येथील न.भू.क्र.६५७ या भूखंडाचे मालक श्री.सिताराम बाबाजी सावंत यांची सन १९६८ खाली गोपाल कृष्ण गोखले मार्गाच्या रस्ता रुंदीकरणासाठी जागा संपादीत करण्यात आली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

अपीलकाराने सदर प्रकरणी मागीतलेली माहिती पुरविली असल्याची पोचपावती जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी आयोगास अवलोकनार्थ सादर केली. यावरुन

उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून आले. व्दितीय अपीलावरील सुनावणीसाठी अपीलकार उपस्थित नव्हते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४२९/०२**

**श्री. वैभव चंद्रकांत कोरगांवकर**
**४८/३, राधाकृष्ण निवास, डॉ.आंबेडकर रोड,**
**दादर (पू), मुंबई ४०० ०१४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप अधिष्ठाता**
**के.ई.एम. रूग्णालय,**
**अधिष्ठाता यांचे कार्यालय,**
**के.ई.एम.रूग्णालय, परेल, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिष्ठाता**
**के.ई.एम. रूग्णालय,**
**अधिष्ठाता यांचे कार्यालय,**
**के.ई.एम.रूग्णालय, परेल, मुंबई ४०० ०१२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. वैभव कोरगांवकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०२.२००९ रोजी अर्ज करून,

१) म्यु.प्लॉट नं.१७३, दादर-नायगांव डिवीजन येथे स्थित राधाकृष्ण निवास ईमारतीमधील दुसरा मजला येथील १२ खोल्या के.ई.एम.रूग्णालय अधिष्ठाता कार्यालय यांजकडून कोणत्या साली व किती वर्षासाठी घेण्यात आल्या होत्या.

२) सदर खोल्या कोणत्या कायद्याने अधिग्रहित केल्या होत्या किंवा लिजने घेतल्या असल्यास सदर लिजची सत्यांकित प्रत मिळावी.

३) सदर खोल्याबाबत आपल्या कार्यालयास सुरवातीस मालक म्हणून कोणाच्या नावाची नोंद आहे त्याबाबतचे अभिलेख प्राप्त व्हावे.

४) सदर मालकी अभिलेखानंतर वेळोवेळी मालकीबाबत झालेल्या बदलाबाबत संबधितांनी आपणास केलो पत्रव्यवहारांच्या प्रती व आपल्या कार्यालयाने सदर पत्रव्यवहाराची दखल

घेत संबधितांना केलेला पत्रव्यवहाराच्या प्रतीबाबत, सदर फाईचे निरीक्षण करुन अभिलेख प्राप्त करणे.

जन माहिती अधिका-यांनी दि.१२.०३.२००९ रोजी अपीलकारास उत्तर देउन माहिती नाकारली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.२४.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०८.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती ही ५० वर्षावरची आहे. रुग्णालयीन सर्व अभिलेख पडताळ्ला असता माहिती उपलब्ध होउ शकली नाही. रा.ए.स्मा.रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी (महापालिका आयुक्त) या कार्यालयाशी संपर्क केला आहे. त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यास अपीलकारास माहिती पुरविण्यात येईल असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, के.ई.एम.रुग्णालय याजकडील काही कार्मचारी राहत असलेल्या खोल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती २० वर्षापूर्वीची असल्याने माहिती देणे योग्य वाटत नाही असे कारण देउन माहिती नाकारली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर माहिती नसल्याचे नमुद करुन तसे आदेश पारित केले. प्रत्यक्षात माहिती मिळविण्यासाठी काय प्रयत्न केले याबाबत अपीलकारास काहीही माहिती दिली नाही. के.ई.एम.रुग्णालयो अधिगृहीत केलेल्या १२ खोल्याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली आहे. सदर खोल्या रुग्णालयाने कर्मचा-यांना निवासस्थान म्हणून राहण्यास दिल्या आहेत. अपीलकाराने मागणी केलेली माहिती फार जुनी असल्याने ती पुरविणे योग्य वाटत नाही असे जन माहिती अधिका-यांनी उत्तर दिले. माहिती उपलब्ध नसल्याचे प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी आदेश पारित केले. सदर दोन्ही उत्तर पुर्णत: विसंगत असल्याचा प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, मागीतलेली माहिती जुनी असल्याच्या कारणावरुन नाकारता येणार नाही. तरी जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२०८०/०२**

**श्री. विजय सी.शहा**
**१८७, बाटा शॉप जवळ,**
**जनात फुट वेअर,**
**भुलेश्वर, मुबई ४०० ००४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**बृहन्मुंबई महनगरपालिका,**
**सी विभाग, सहाय्यक आयुक्त,**
**७६ श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी विद्युत वाहिनीजवळ,**
**मुंबई ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महनगरपालिका,**
**सी विभाग, सहाय्यक आयुक्त,**
**७६ श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी विद्युत वाहिनीजवळ,**
**मुंबई ४०० ००२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. विजय शहा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०९.२००८ रोजी अर्ज करुन, चाळी पध्दतीच्या इमारतीमध्ये सामाईक सौचालय असले तरी सदनिकेत सौचालय खाजगीरित्या बांधण्याकरिता परवानगी करिता अर्ज कोणाकडे करणे आवश्यक आहे. त्याकरिता कोणकोणती कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. याबाबत सविस्तर माहिती मागीतली होती. अवैद्यरित्या खाजगीरित्या सौचालय बांधल्यास त्याविरुध्द कोणत्या विभागाकडून कारवाई करण्यात येते याबाबतची माहिती मागीतली होती. चाळी पध्दतीच्या इमारतीमध्ये सदनिकाधारक सामाईक सौचालय असतांना स्वत:च्या सदनिकेमध्ये खाजगीरित्या सौचालय बांधू शकतो की? याबाबत

माहिती मागीतली होती. सदर माहिती प्रत्यक्षात कार्यालयात व्यक्तीश: उपस्थित राहून अपीलकार प्राप्त करणार असल्याचे दि.०९.०९.२००८ च्या अर्जात नमूद केले होते. अपीलकारास हवी असलेली माहिती सहाय्यक अभियंता (इ व का) यांच्या कार्यालयात रविवार व सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते दुपारी १.०० या वेळेत येउन घेउन जावे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविले. श्री.रावत यांनी माहिती तयार नसल्याचे सांगीतले. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील केले. आदेश मिळले नाही. म्हणून व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपिलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, चाळी पध्दतीच्या इमारतीमध्ये सामाईक सौचालय असले तरी सदनिका धारक खाजगी सौचालय बांधू शकतो का? याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयीन वेळेत कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावे असे जन माहिती अधिका-यांनी दि.१८.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले होते. अपीलकाराने प्राधिकार पत्र देउन त्यांच्या प्रतिनिधी कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेणेकरिता पाठविला होता. अपीलकाराचे प्रतिनिधी श्री.डी.एन.शाह हे तात्कालीन सहाय्यक अभियंता (इ व का) सी/विभाग तथा जन माहिती अधिकारी यांना भेटले. त्यावेळी जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराच्या प्रतिनिधीस सांगीतले की, माहिती तयार नाही. यामुळे अपीलकारास माहिती मिळाली नाही. अपीलकाराने सदर वस्तुस्थिती नमुद करुन प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा म.न.पा. आयुक्त यांना सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही.

अपीलकारास मागणी प्रमाणे जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये जन माहिती अधिका-याविरुध्द

शास्ती लादण्याची कारवाई का? करू नये याबाबत दि.१०.०९.२००९ रोजी करणे दाखवा नोटीस पाठवून जन माहिती अधिका-याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. जन माहिती अधिका-यांनी दि.२०.१०.२००९ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ०७ प्रमाणे तीस कामकाजाच्या दिवसांमध्ये उत्तर देणे बंधनकारक आहे. अर्जदाराचा अर्ज पालिका आयुक्तांच्या कार्यालयात दि.१२.०९.२००८ रोजी प्राप्त झाला आहे. पुढील कारवाईसाठी हा अर्ज (अपीलकारांचे अर्ज) सहाय्यक आयुक्त, सी विभाग कार्यालयात दि.१७.०९.२००८ ला प्राप्त झाला आणि जन माहिती अधिका-याकडे दि.२३.०९.२००९ ला प्राप्त झाला. अपीलकारास उत्तर दि.१८.१०.२००८ ला देण्यात आहे.

तीस (३०) कामकाजाचे दिवस रविवार व इतर सार्वजनिक सुट्टीच्या व्यतिरिक्त दि.१७.०९.२००८ ते दि.१८.१०.२००८ मध्ये चार रविवार मोडतात. पक्षकाराला उत्तर ३० कामकाजाच्या दिवसांत पाठविणे बंधनकारक आहे, म्हणून वेळेवर उत्तर देण्यात आले आहे.

वरील निवेदनात जन माहिती अधिका-याचा खुलासा आयोगाकडे करण्यात आला आहे. तरी सदर निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा, अशी जन माहिती अधिका-यांनी विनंती केली आहे.

जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकारास दि.१८.१०.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. सदर उत्तरानुसार कार्यालयातून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले आहे. परंतू अपीलकाराच्या प्रतिनिधीस माहिती दिली नाही. माहिती तयार नसल्याचे सांगीतले आहे. यावरून जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती दिलेली नाही. आयोगाकडेही सादर केली नाही. जन माहिती अधिका-यांचा सदर खुलासा मान्य करण्या जोगा नाही. यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग झाला आहे. यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरून त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादणे क्रमप्राप्त आहे.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास १५ दिवसांचे आत माहिती पुरवावी. अपीलकारास माहिती पुरविण्यात जन माहिती अधिका-याकडून कसून झाली आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अन्वये रू.५०००/- जन माहिती अधिका-याविरूध्द शास्ती लादण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम पाच समान हप्त्यात डिसेंबर, २००९ च्या वेतनातून वसूल करण्यात यावी. शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरल्याची चलनाच्या प्रती आयोगाकडे सादर कराव्यात.

मुंबई
दिनांक ३१.१०.२००९

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४३५/०२**

**श्री. महेश शांडिल्य**
**१२, गीतिका,**
**८५, एस.व्ही.रोड,**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०५४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एच/पश्चिम विभाग, वांद्रे (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.महेश शांडिल्य यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.३०.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते. गैरतक्रारदार हजर होते. गैरतक्राराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन एस.व्ही.रोड, सांताक्रुझ, मुंबई येथील गीतिका सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या तळमजल्यावरील डायनेस्टी हॉटेल बाबत तक्रार केली होती. सदर हॉटेलच्या मालकाकडून संस्थेची मोकळी जागा अवैद्यरित्या वापरात होती. सदर मोकळ्या जागेत पाण्याची टाकी गॅस कॅबीन व सौचालय बांधण्यात आले होते. याबाबत तक्रारदाराने तक्रार केली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी तक्रारीवरील कारवाईची माहिती अपीलकारास विहित कालावधीत पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील क्र.२००८/५६१/०२ सादर केले होते. सदर प्रकरणी अवैद्यरित्या जागेच्या वापराबाबत, महानगरपालिकेने केलेल्या कारवाईची माहिती तक्रारदारास ४५ दिवसाचे आत पुरवावी असे

दि.३०.०७.२००८ रोजी आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतर माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.४३५/०२ ही तक्रार दाखल केली. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने खालीलप्रमाणे लेखी अहवाल दाखल केला.

म.न.पा. ने हॉटेल मालकावर, महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, १९९६ कलम ५३(१) अन्वये इमारतीच्या मोकळया जागेत पाण्याची टाकी, गॅस कॅबीन व सौचालय बांधण्याबाबत दि.२२.१२.२००८ रोजी नोटीस बजावण्यात आली हॉटेल मालकाने नोटीस प्राप्त झाल्यावर मा.उच्च न्यायालयात दावा क्र.१६७/०९ अन्वये Civil Application क्र.१६४८ दाखल केला. मा.न्यायाधिश श्री.आर.एम.सावंत यांच्या कोर्ट रुममध्ये दि.२३.०१.२००९ रोजी सुनावणी झाली. मा.न्यायाधिशांच्या निर्देशानुसार, हॉटेल मालकास म.न.पा. कडे, सदर जागेचा वापर अधिकृत करण्यासाठी प्रस्ताव करण्यास ४ आठवडयाची मुदत देण्यात आली. हॉटेल मालकाने तसा प्रस्ताव म.न.पा.कडे दाखल केला असेल आणि सदर प्रस्ताव मनपाच्या विचाराधीन असेल तर मनपाने बजाविण्यात आलेल्या ५३(१) नोटीसच्या अनुषंगाने कोणतही कारवाई करु नये.

आयोगाच्या दि.३०.०७.२००८ च्या आदेशानुसार तक्रारदारास दि.०६.०२.२००९ व २६.०३.२००९ रोजी सदर प्रकरणातील सद्यस्थिती तक्रारदारास कळविली आहे असे गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या दि.३०.०७.२००८ च्या आदेशाची अमंलबजावणी केली असल्याचे दिसते. या परिस्थितीत सदर तक्रारीसंबंधी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४५८/०२**

**श्री. लालचंद थुडूराम शर्मा**
**रजि नं.७९७५ टोळी नं.४४५,**
**मे.निटको रोडवेज प्रा.लि.**
**रामकृपा बिल्डींग, प्लॉट नं.७५,**
**वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**माल वाहतुक कामगार मंडळ, बृहन्मुंबई,**
**१०२/१०३, स्टील चेंबर्स,**
**देवजी रतनशी मार्ग, दाणाबंदर, मुंबई ४०० ००९.**

**जन माहिती अधिकारी,**
**माल वाहतुक कामगार मंडळ, बृहन्मुंबई,**
**१०२/१०३, स्टील चेंबर्स,**
**देवजी रतनशी मार्ग, दाणाबंदर, मुंबई ४०० ००९.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. लालचंद थुडूराम शर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०१.२००९ रोजी अर्ज करुन, वाशी येथील मेसर्स निटको रोडवेज प्रायव्हेट लि. मधील माथाडी कामगाराबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.०१.२००९ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.०४.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास मुध्देनिहाय माहिती दि.१७.०६.२००९ च्या पत्रान्वये पुरविली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, माथाडी कामगाराबाबत अनुषंगीक मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास सविस्तर मुध्देनिहाय उपलब्ध माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगाच्या निदर्शनास आणले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२००९/२७८/०२

**श्री. दिनदयाल ख्यातिसिंग कमवाल,**
**फ्लॅट नं.५०४/ए,राधाकष्ण अपाटमेंट,**
**एस.व्ही.रोड दहिसर (पूर्व), मुंबई ६८.** .... अपीलकार

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता**
**इमारत व कारखाने,बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई ४०० ०५५.** .... उत्तरवादी

**विवेचन**

तक्रारदार श्री.दिनदयाल कमवाल यांनी माहितीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर राज्य माहिती आयोग बहन्मुंबई कायार्लयात दि.२६.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार उपस्थित होते. गैरतक्रारदार अनुपस्थित होते.

तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन खेरवाडी,बांद्रा शॉप नं.२९ प्लॉट नं.१४,येथील अनधिकृत बांधकामाविषयी माहिती मागितली होती. उत्तरवादी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे क्र.४३७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास सदर प्रकरणी ३० दिवसाचे आत उपलब्ध माहिती द्यावी असे दिनांक ३०.०७.२००८ रोजी आयोगाने आदेश पारित केले. सदर प्रकरणी माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

गैरतक्रारदार सदर प्रकरणी क्र.२७८/०२ या तक्रारीवरील सुनाणीकरिता अनुपस्थित होते. याकरिता गैरतक्रारदारास जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्तीची कारवाई का करु नये याबाबत खुलासा मागविण्यात आला आहे. आयोगाच्या दिनांक ३०.०७.२००८ च्या आदेशास अनुसरुन तक्रारदारास दिनांक १७.०८.२००८ रोजी एकूण १२ कागदपत्राच्या छायाप्रती पुरविण्यात आल्या असल्याचा

गैरतक्रारदाराने दिनांक १६.११.२००९ रोजी लेखी खुलासा आयोगास सादर केला आहे. तसेच तक्रारदारास माहिती पुरविण्याची पोचपावती गैरतक्रारदाराने आयोगास सादर केली.क्र.२७८/०२ या तक्रारीवरील दिनांक २६.०८.२००९ च्या सुनावणीकरीता पाठविलेले दिनांक २०.०८.२००९ चे पत्र दिनांक २६.०८.२००९ रोजी सायंकाळी ४.३० वाजता पोष्टाकडून मिळाले असल्याने सुनावणीकरीता गैरतक्रारदार हजर राहू शकले नाहीत. यासाठी गैरतक्रारदाराने क्षमा याचना केली आहे.

भूखंड क्र.१४ च्या मालकीबाबत कौटुंबीक वाद असून सदर बाबत मा.उच्च न्यायालयात दावा प्रलंबित आहे. सदर बाबतीत मा.उच्च न्यायालयाच्या निणर्यानंतर अनधिकृत बांधकामाचे निष्कासन महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार करण्यात येइर्ल असा अहवाल तक्रारदाराने आयोगास सादर करुन खुलासा केला आहे. गैरतक्रारदाराने दिनांक १६.११.२००९ रोजी सादर केलेला अहवाल लक्षात घेता तक्रारदारास दिनांक १७.०८.२००८ रोजी माहिती पुरवून गैरतक्रारदाराने आयोगाच्या दिनांक ३०.०७.२००८ च्या आदेशाचे पालन केले असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४६९/०२**

**श्री. सुधीर बळवंत साळवी,**
**डीए-३, श्रीकृष्ण सोसायटी**
**सुंदरबाग लेन, कुर्ला (प),**
**मुंबई ४०० ०७०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**सहा पालिका आयुक्त यांचे कार्यालय,**
**एल विभाग, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.सुधीर बळवंत साळवी यांनी माहितीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेगाकडे दिनांक ३०.०६.२००९ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि.१९.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता तक्रारदार उपस्थित होते. गैरतक्रारदार अनुपस्थित होते. सुनावणीचेवेळी तक्रारदाराचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन वॉत्टनवाडी, चर्चरोड, नवपाडा, कमानी, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७० येथील साळवी चाळ, रुम क्र.२ व रुम क्र.१४ मध्ये अनधिकृतरित्या बांधकाम झाले त्याची तक्रार दि.२३.०७.२००८, दि.०६.०८.२००८ व दि.२९.०८.२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती बाधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली असल्यास महापालिकेच्या परवानगी पत्राची प्रत मिळावी अशी मागणी केली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत तक्रारदारास माहिती दिली नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले होते. महानगरपालिकाकडे केलेल्या तक्रारीतील रुम क्र.२ व रुम क्र.१४ मधील अनधिकृत बांधकामास महानगरपालिकेने परवागनी दिलेली नाही. हे जरी मान्य असले तरी सदर अनधिकृत बाधंकामाविरुध्द कारवाई करुन केलेल्या

कारवाईची माहिती ४५ दिवसाचे आत अपीलकारास कळवावी असे आयोगाने दि.१७.०३.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती दिली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.४६९/०२ ही तक्रार दाखल केली आहे.

अनधिकृत बांधकामाविरूध्द कारवाई करून केलेल्या कारवाईची माहिती तक्रारदारास कळविण्याबाबत आयोगाने पारित केलेल्या दि.१७.०३.२००९ च्या आदेशाचे गैरतक्रारदाराने पालन केले नाही. तक्रारदारास माहिती दिली नाही. याकरिता गैरतक्रारदारास जबाबदार धरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार गैरतक्रारदाराविरूध्द शास्ती लादण्याची कारवाई का? सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयेगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४५४/०२**

**श्री. प्रशांत जयमल्हार बिडवई**
**शनिनगर, श्री रामदर्शन अपार्टमेंट,**
**२ रा माळा, बदलापूर (प),**
**ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०३. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ ९, बांद्रा (प), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पश्चिम नियंत्रण कक्ष, बांद्रा (प), मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रशांत बिडवई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०३.२००९ रोजी अर्ज करून, अपघात गुन्हा रजि क्र.४२२/०८, मधील ड्रायव्हरचे नाव, पत्ता, कोर्ट केस क्रमांक कुठले कलम लावले, तसेच गाडीचे पेपर, ईश्युरन्स, लायसन्स कॉपी, दोषारोपत्र याच्या सत्याप्रती तसेच अपघातासंबंधीचा अहवाल (Report) फॉर्म याची मागणी केली होती. सदर प्रकरणी गुन्हा तपासाधीन आहे. एक्सीडंट रिपोर्ट न्यायालयात सादर करण्यात आला आहे. सदरहू गुन्हा हा तपासाधीन असल्याने उक्त अधिनियमातील कलम ८(१) (ज) मधील तरतुदीनुसार माहिती नाकारण्यात आली. तसे जन माहिती अधिका-यांनी दि.०१.०४.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. माहिती समधानकारक मिळाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.०९.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करून प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०५.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपघात गुन्हा रजि.क्र.४२२/०८ बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी उक्त अधिनियमातील कलम ८(१) (ज) अनुसार माहिती नाकारली आहे. एक्सीडेंट रिपोर्ट न्यायालयात सादर करण्यात आला असल्याचे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले आहे. तेव्ही उक्त अधिनियमातील कलम ८(१) (ज) चा आधार घेउन माहिती नाकारता येणार नाही. तरी जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३०.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४९८/०२**

**श्री. कौस्तुभ द. गोखले**
**सिध्दीविनायक प्रसाद,**
**डॉ.शामा मुखर्जी रोड,**
**डोंबिवली (पु) ४२१ २०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृहनिर्माण विभाग,**
**मंत्रायल, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. कौस्तुभ गोखले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील माहिती मागीतली होती.

१. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत होत असलेल्या लोकसंख्या वाढीमुळे नागरी विकास व पायाभुत सुविधा देणे करिता, असलेली लोकसंख्या, समाज रचना, भौगोलिक रचना व आर्थिक स्थितीचा विचार करुन शहारातील पायाभुत सुविधांचा दर्जा आणि सुधारणा तसेच शहराचा नियोजनबध्द विकास करण्याच्या दृष्टीने महापालिका, केंद्र शासन व राज्य शासना मार्फत राबविल्या जाणा-या "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुस्थान अभियाना" (JNNRUM) मध्ये तसेच BSUP मध्ये शहराच्या आवश्यकते

नुसार जे विविध विभागांचे प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचे मार्फत राज्य शासनाच्या राज्यस्तरीय सुकाणू समिती (SLSC) कडे मंजूरीस्तव पाठविले. सदर प्रकल्प पाठविताना या सोबत कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने प्रत्येक प्रकल्प निहाय वा एकत्रितपणे या सोबत सत्यप्रतिज्ञापत्र पाठविले असल्यास त्याच्या वा त्यांच्या सत्यप्रती मिळाव्यात.

२. उपरोक्त प्रकल्प राज्य शासनाच्या मंजूरी नंतर केंद्र शासनाच्या सेंन्ट्रल सॅक्शनिंग ॲन्ड मॉनिटरींग कमिटी (CSMS) मंजूरीसाठी पाठविलेत व त्यांच्या मंजूरीसाठी या सोबत प्रत्येक प्रकल्प निहाय वा एकत्रितपणे या सोबत सत्यप्रतिज्ञापत्र पाठविले असल्यास त्याच्या वा त्यांच्या सत्यप्रती मिळाव्यात.

३. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुस्थान अभियांना (JNNRUM) मध्ये तसेच BSUP मध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिकाने सादर केलेल्या विकास आराखडयास शासनाने दिलेल्या मंजूरीची धारिका तसेच माननीय मुख्यमंत्र्याच्या मान्यता या बाबत माहिती तसेच कागदपत्रे मिळावीत.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउप अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२९.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियांनामध्ये (JNNRUM) तसेच BSUP मध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने सादर केलेल्या विकास आराखडयास शासनाने दिलेल्या मंजूरीची धारीका व इतर अन्य माहिती मागीतली होती. अपीलकाराने सदर माहिती नगर विकास विभागातील जन माहिती अधिका-याकडे मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेल्या माहितीचा विषय गृहनिर्माण विभागाशी संबंधित असल्याचे नगर विकास विभागीय जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. अपीलकाराचा अर्ज गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतरित केला. व्दितीय अपीलातील सुनावणीचेवेळी गृहनिर्माण विभागातील जन माहिती अधिका-यांनी लेखी अहवाल सादर केला. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानांतर्गचे कार्यक्रम हे नगर विकास विभागामार्फत राबविले जातात. या अभियांनातर्गत नागरी पायाभूत सोईसुविधा पुरविणे हा कार्यक्रम नगर विकास विभागामार्फत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) या नोडल एजन्सी मार्फत राबविण्यात येतो. नागरी क्षेत्रातील गरिबांना मुलभूत सेवा पुरविणे (BSUP) हा कार्यक्रम गृहनिर्माण विभागामार्फत म्हाडा या नोडल एजन्सी मार्फत राबविला जातो असा लेखी अहवाल गृहनिर्माण विभागातील जन माहिती अधिका-यांनी सादर करुन प्रतिपादन केले. BSUP बाबत केंद्रशासनाकडे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविलेल्या दि.०५.११.२००७ च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिली. सत्यप्रतिज्ञा पत्राची माहिती म्हाडा कडे अपीलकारास उपलब्ध होउ शकेल. विकास आराखडयास मान्यता देण्याची कार्यवाहीबाबत अपीलकाराने नगर विकास विभागाकडे विचारणा करावी असेही जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांनी व्दितीय अपीलाचेवेळी प्रतिपादन केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (३) अनुसार नगर विकास विभागाने माहितीच्या अर्जातील नगर विकास विभागाशी संबंधीत मुद्याची माहिती अपीलकारास देणे आवश्यक आहे. परंतू सदर प्रकरणी तसे न करता अपीलकाराचा अर्ज गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतरित केला. नगर विकास विभागातील जन माहिती अधिका-याची सदर कृती कायद्याचा भंग करणारी आहे.

या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.नि.सु.कोठावदे यांनी नगर विकास विभागाशी संबंधीत मुद्याची माहिती, तसेच जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.प्र.पु.बडगेरी यांनी गृह निर्माण विभागाशी संबंधीत मुद्याची माहिती यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१०.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३४५७/०२**

**श्री.उमेश नरसु च्यारी**
**अे/१५, १ ला मजला,**
**हनुमंत ॲन्थोनी स्ट्रीट,**
**वाकोला, सांताक्रुझ (पू),**
**मुंबई ४०० ०५५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हा, रुम नं.१३,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**बांद्रा (पु), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक**
**वर्ग-२, (अभिलेख विभाग),**
**मुंबई उपनगर जिल्हा, रुम नं.१३,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर,**
**बांद्रा (पु), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. उमेश च्यारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.२००८ रोजी अर्ज करुन, खालील माहिती मागीतली होती.

अपीलकाराच्या सदनिकेचे मुळ दस्त क्र.वि.ओ.एम.बि.३१७३-८४ मला मिळणेबाबत. सबब शासनाच्या अभय योजनेचा फायदा मिळविण्याकरिता त्यांना मुळ दस्ताची तातडीची निकड होती. परंतु जन माहिती अधिका-याकडून प्राप्त झालेली पत्रे (क्र.१) जावक क्र.१००२/२००८ दि.१८.११.२००८ (क्र.२) जा.क्र.२१३/२००८ दि.१९.११.२००८ (क्र.३०) जा.क्रक.१०४३/२००८ दि.२८.११.२००८ या अन्वये माहिती दिशाभुल करणारी देण्यात आली. तसेच दि.०९ जुन २००९ रोजी मिळालेले पत्र क्र. जावक मा.अ/आ.च्यारी/दस्त ३१७३/८४-

२५५/०९ दि.२८.०५.२००९ व्दारे विलंब माझ्यामुळेच झाल्याचा ठपका ठेवला आहे. तसेच प्रकरणात वेगळा गुंता निर्माण करुन ठेवला आहे. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती एक तर उशिरा मिळाली त्यात त्रुटी आहेत त्याच बरोबर अपीलकाराने वेळेचे भान राखुन परिस्थितीचे गांभिर्य ओळखून योग्य ती खबरदारी घेउन सुध्दा दंडास पात्र ठरलो आहे का? व कसे?

पुणे येथील माहिती अधिकारी यांचे मिळालेले पत्र क्र.जा.पक्षकार/मा.अ.अ/प्र.क्रक३/२६०/०९ दि.३०.०३.२००९ शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, ५, फायनान्स रोड, पुणे ४११ ००१ हे कशाचे संकेत देते.

जन माहिती अधिका-याकडून मिळालेल्या पत्रात अनु.क्र.३ (एक) यात प्रथम पक्षकार (श्रीमती कमलाबाई फ्रान्सीस) सदनिका विकत घेणारी व्यक्ती आहेत याचा शोध माहिती अधिका-यांनी कोठून लावला याची माहिती मिळेल का? शासनाची अभय योजना संपुष्टात आली आहे तर अपीलकारास मुद्रांक शुल्कावर जो दंड आकारण्यात येणार आहे त्यास मी का व कसा पात्र ठरलो? याची माहिती मिळावी. आपण व्यक्तीशीरपणा दाखविला आहे का? पुणे येथुन अग्रेषण पत्र क्र.१३ अन्वये दि.१७.०२.२००९ अन्वये माझा दस्त प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिका-यांनी मला कोणत्या दिवशी व कोणत्या माध्यमातून कळविले याची माहिती द्यावी.

सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ (अभिलेख विभाग) यांनी दस्त क्र.बी.ओ.एम.बी ३१७३/१९८४ दि.२४.०३.१९०४ या नोंदणी केलेला सदरचा दस्त त्यांचेकडे असल्याचे जन माहिती अधिका-यांना दि.१८.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले. सदर दस्त सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ (अभिलेख विभाग) यांचेशी संपर्क साधून प्राप्त करावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान नसल्याने अपीलकाराने दि.१७.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. दस्त क्र.BOM-B-३१७३/८४/ हा मुळ दस्त प्राप्तीसाठी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर सदर दस्तावर नोंदणी पुढील योग्य ती कार्यवाही करुन सदर दस्त अपीलकारास उपलब्ध करुन दिला जाईल

असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०४.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दस्त क्र.बीओएम-बी-३१७३/८४ ची मागणी केली होती. सह जिल्हा निबंधक वर्ग २ अभिलेख बांद्रे यांनी त्यांचे अखत्यारित विषयांकित दस्त अपीलकार यांचे नावावर नसल्याने, त्यांचे ताब्यात दस्त देणेकरिता नियमानुसार आवश्यक ती कागदपत्रे, सादर करणेस अवगत केले. तथापि सदर माहिती अधिकारातील अर्जाबाबत प्रथम अपीलावर झालेल्या सुनावणी वेळी उपलब्ध कागदपत्राच्या अनुषंगाने दस्ताचा ताबा अपीलकार यांना देणेबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश दिले. त्यानुसार सह जिल्हा निबंधक वर्ग-२ (अभिलेख), बांद्रा यांनी अपीलकारास दस्त उपलब्ध करुन दिला. सदर दस्त हा सन १९९२ मध्ये नोंदणी पूर्ण करुन तरतुदीनुसार शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे यांचेकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविला होता. सदर मुद्यात नमुद केलेप्रमाणे अपीलकारास विषयांकित दस्ता संदर्भात कोठल्याही प्रकारचा दंड आकारण्यात आला नाही. सदर दंडाच्या कोठल्या रक्कमेबाबत अपीलकार विचारणा करत आहेत याचा उलगडा होत नाही. यामुळे त्याबाबत कार्यालय कोठल्याही प्रकाराचे अभिप्राय सादर करु शकत नाही असा प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१०.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**